**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दूरस्थ पद्धतीने राज्यातील १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं होणार उद्घाटन.**
2. **तळागाळातील प्रत्येक गरीब नागरिकांपर्यंत उत्तम स्वास्थ्य सेवा पोहचविण्यासाठी सरकार प्रतिबद्ध असल्याचं केंद्रीय स्वास्थ्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचं एम्स नागपूर इथं प्रतिपादन.**
3. **विधानसभा निवडणुकीच्या निकालांत हरियाणात भाजप तर जम्मू आणि काश्मीर मध्ये नॅशनल कॉन्फरन्स पक्ष आघाडीवर.**
4. **७० व्या राष्ट्रीय चित्रपटपुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण; अभिनेते मिथुन चक्रवर्ती दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित.**
5. **कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल जॉन जे.हॉपफिल्ड आणि जेफ्री ई.हिंटन यांना भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर.**

**शासकीय महाविद्यालयांचं उद्घाटन**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दूरदृश्यप्रणालीद्वारे नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा उद्घाटन सोहळा आयोजिण्यात आला आहे. यात विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोली या जिल्हयांचा समावेश असून याव्यतिरिक्त राज्यातील अंबरनाथ, मुंबई, नाशिक, जालना, हिंगोली इथं देखील हा सोहळा होणार आहे. उद्या दुपारी १ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी या महाविद्यालयांचं उद्घाटन करतील. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीसह केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांसह वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे.**

__वर्धापन दिन-एम्स__

**तळागाळातील प्रत्येक गरीब नागरिकापर्यंत उत्तम स्वास्थ्य सेवा पोहचविण्यासाठी आमचं सरकार प्रतिबद्ध असल्याचं प्रतिपादन केंद्रीय स्वास्थ्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. नागपूर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्सच्या 6 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना ते संबोधित करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशातील स्वास्थ्य सुविधांमध्ये सातत्यानं वाढ होत आहे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या वाढविण्याचा देखील निर्णय अलीकडे घेण्यात आला. यासोबतच वैद्यकीय सेवा क्षेत्रातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा देणं ही आमची प्राथमिक जबाबदारी असल्याचं जाधव यांनी सांगितलं. वैद्यकीय सेवेबाबत सरकारचं धोरण अधिक स्पष्ट करताना ते म्हणाले-**

***__हम विशिष्ट रूप से मानते हैं, कि उत्तम स्वास्थ्य सुविधाएं केवल बीमारी की इलाज तक सीमित नहीं है, बल्कि ये सामाजिक न्याय को भी सुनिश्चित करती है । आयुष्मान योजना और जन औषधी केंद्रो के जरीये देश के सामान्य नागरिकों को करोड़ों रुपए की बचत अभी तक हुई है । इसके अलावा योग और आयुष को बढ़ावा देणे से भी स्वास्थ के खर्चे में कमी आई है । आयुषसे आरोग्य का हमारा कॉन्सेप्ट दुनिया भर के देशों को हमारे समृद्ध पुरातन चिकित्सापद्धति की ओर आकर्षित कर रहा है ।__***

**अत्यंत कमी दरात उत्तम वैद्यकीय सेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्रातील पहिल्या एम्सची नागपूर इथं 2018 साली स्थापना करण्यात आली. दररोज सुमारे साडेचार हजार रुग्ण इथं उपचार घेत आहेत. तंबाखू नियंत्रण आणि तृतीयपंथीयांसाठी इथे विशेष सुविधा दिल्या जात असल्याचं कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी सांगितलं. एम्स नागपूरचे अध्यक्ष डॉ विकास महात्मे, खासदार डॉ अजित गोपचाडे, आणि श्यामकुमार बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी सन्मानित करण्यात आलं.**

**<u>मतमोजणी</u>**

**हरियाणा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाला महत्व दिल्याचं  दिसून आलं. काँग्रेसने लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. जम्मू काश्मीरमध्ये काँग्रेसला मिळालेले यश नॅशनल कॉन्फरन्सच्या मदतीने मिळाले आहे. उलट जम्मू क्षेत्रात भाजपची ताकद वाढली आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आज मुंबईत माध्यमांशी बोलताना दिली. हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभेच्या मतमोजणीच्या निकालांच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. आतापर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार हरयाणात विधानसभेच्या ९० जागांपैकी भाजपने ४९ जागांवर आघाडी मिळवली आहे, तर काँग्रेस ३६ जागांवर आघाडीवर आहे. जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेच्या ९० जागांपैकी नॅशनल कॉन्फरन्स ४२ जागांवर, भाजप २२ जागांवर, तर काँग्रेस आठ जागांवर आघाडीवर आहे.**

**<u>हवाई दल</u>**

**भारतीय हवाई दल आज आपला ९२ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. त्यानिमित्त  चेन्नईच्या तांबरम इथल्या  तळावर संचलन आणि हवाई प्रात्यक्षिकांचं सादरीकरण करण्यात आलं. हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वायुसेना दिनानिमित्त भारतीय हवाई दलाला शुभेच्छा दिल्या आहेत. साहस आणि कठोर व्यावसायिक दृष्टिकोन ही हवाई दलाची वैशिष्ट्यं आहेत आणि देशाच्या संरक्षणामध्ये त्यांनी निभावलेली भूमिका ही अत्यंत कौतुकास्पद आहे, असं पंतप्रधानांनी  आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.**

**<u>आकाशवाणी धम्म पहाट</u>**

**आकाशवाणीच्या  नागपूर केंद्राद्वारे आगामी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त 'धम्म पहाट' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, या अंतर्गत 'धम्मनाद' हा सुगम संगीताचा कार्यक्रम उद्या दिनांक** 9 **ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता, स्वतंत्रता भवन वसंतराव नाईक गव्हर्मेंट इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स अँड सोशल**

सायन्स, आरबीआय चौक, सिविल लाईन इथं आयोजिण्यात आला आहे. यावेळी सुप्रसिद्‌ध सुगम संगीत गायक अनिल खोब्रागडे आणि वीणा उकुंडे यांच्या गायनाचा रसिक श्रोत्यांना लाभ घेता येणार आहे.

## स्वास्थ्य सुरक्षा संकल्प - मंत्री जाधव

प्रधानमंत्री स्वनिधी योजना लाखो कुटुंबासाठी जीवनरेखा ठरली असून या योजनेतून त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. या योजनेतून कर्ज घेऊन स्ट्रीट फूड व्यावसायिकांनी आपला व्यवसाय वाढवावा आणि अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात यावं, असं प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्रालय आणि केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज नागपूर इथं व्यक्त केलं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय अंतर्गत ‘स्वच्छ आहार संकल्प’ या भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण- FSSAI द्‌वारे आयोजित स्ट्रीट फूड व्यावसायिकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन नागपुरातील सुरेश भट सभागृह इथं करण्यात आलं होतं. एफएसएसएआयच्या प्रशिक्षण कार्यक्रमातून स्ट्रीट फूड व्यावसायिकांनी आपली कार्यशैली सुधारावी आणि स्वच्छ पौष्टिक खाद्‌यपदार्थ जनतेसाठी उपलब्ध राहतील, यासाठी प्रयत्नशील असावं, असं आवाहन जाधव यांनी यावेळी केलं. केंद्र सरकार देशातील दहा मोठ्या शहरात आणि 100 जिल्ह्यात एफएसएसआयए संचालित स्ट्रीट फूड रोड तयार करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. या प्रशिक्षणात नागपूर इथून 2000 तर मुंबईतून 1000 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

## चित्रपट पुरस्कार

७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण झालं. अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरवण्यात आलं. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कारांचं वितरणही करण्यात आलं. कन्नड चित्रपट कांतारा मधल्या उत्कृष्ट अभिनयासाठी ॠषभ शेट्‌टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तामिळ

चित्रपट थिरुचित्रंबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेस साठी मानसी पारेख यांना देण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उपस्थितांना संबोधित करताना, चित्रपट क्षेत्रासाठी हाती घेण्यात आलेल्या आगामी उपक्रमांची माहिती दिली.

## भौतिकशास्त्र नोबेल पुरस्कार

भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाल्याचं रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं आहे. या दोन्ही शास्त्रज्ञांनी आधुनिक काळातील शक्तिशाली मशीन लर्निंगचा पाया असलेल्या पद्धती विकसित करण्यासाठी भौतिकशास्त्रातील साधनांचा वापर केला. जॉन हॉपफिल्डने एक सहयोगी मेमरी तयार केली आहे, जी डेटामध्ये प्रतिमा आणि इतर नमुने संग्रहित आणि पुनर्रचना करण्यास सक्षम आहे, तर जेफ्री हिंटन यांनी स्वायत्तपणे डेटामधील गुणधर्म आणि प्रतिमांमधील विशिष्ट घटक ओळखण्याची कार्यपद्धत शोधली आहे.

## हवामान

नागपूर जिल्ह्यात आज दुपारी काही ठिकाणी अल्पावधीसाठी तुरळक पावसाची नोंद झाली. जयताळा, हिंगणा, वाडी परिसरात अल्प काळासाठी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. दरम्यान, येत्या काही तासात विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर आणि वाशीम जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता आहे. याशिवाय नागपूर, भंडारा, गोंदिया आणि अमरावती जिल्ह्यांत देखील तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. गडचिरोली शहरासह काही भागात संध्याकाळी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले. संध्याकाळी साडेचार वाजतापासून जोरदार पावसास सुरुवात झाली.

**<u>बाजार समित्यांची निवडणूक</u>**

**राज्य सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढं ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे ३१ डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचं, याबाबतच्या शासन आदेशात म्हटलं आहे. अडीचशेपेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.**

*****